# महाराष्ट्र शासन
# धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
# मुंबई यांचे कार्यालय

**धर्मादाय आयुक्त भवन,**
३रा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०० ०१८.
दूरध्वनी क्रमांक०२२- २४९३५४३४ २४९३५४९०
२४९३०४९९ २४९३५५१६
फॅक्स ०२२-२४९७६४२०
Email Id:- cc-mahastate@mahacharity.gov.in

**Dharmaday Ayukt Bhavan**
3rd Floor, 83,Dr. Annie Besant
Rd,Worli, Mumbai - 400 018
Tel No.022- 24935434 24935490
24930499 24935516
Fax-022-24976420
web- charity.maharashtra.gov.in

---

जावक क्र. १४६२ /२०२०
धर्मादाय आयुक्त कार्यालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.
दिनांक – ३०.०३.२०२०

## आवाहन

सध्या महाराष्ट्र राज्यामध्ये कोरोना (COVID-१९) या विषाणुच्या फैलावामुळे जगातील इतर देशाप्रमाणे परिस्थिती निर्माण झालेली असुन त्याचा सामना करण्यासाठी केंद्र शासन तसेच राज्य शासन त्याचे परिने सर्वतोपरी उपाययोजना करीत आहे.

लॉक डाउनमुळे महाराष्ट्रात निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेता, गरीब व कष्टकरी तसेच मजुर यांच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी, त्यांना जिवनावश्यक वस्तु, अन्नधान्य आणि/अथवा औषधोपचार पुरविण्याची तसेचमा. पंतप्रधान साह्यता निधी आणि मा. मुख्यमंत्री साह्यता निधी मध्ये आर्थिक स्वरुपात मदत करण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे.

अशा परिस्थितीत शासन, त्याचे परीने आवश्यक त्या सर्व उपाययोजना करीत आहेच. परंतु, सामाजिक बांधिलकी व सामाजिक उत्तरदायित्व म्हणुन, अशा उददेशाने स्थापन झालेल्या सर्व धर्मादाय संस्था(ट्रस्ट) यांनी पुढाकार घेणे गरजेचे झाले आहे. जेणेकरुन पीडीतांना व गरजुंना शक्य ती मदत करता येईल. शासनाने घोषित केलेल्या १) लॉकडाउनच्या बंधनास आधीन राहुन, तसेच २) कोरोना प्रसार प्रतिबंध करण्यासाठीच्या आवश्यक त्या आरोग्य विषयक मार्गदर्शन तत्वांचे पालन करुन, तसेच ३) शासकीय यत्रंणा (जसे की, जिल्हाधिकारी, पोलिस अधिक्षक/उप अधिक्षक,तहसीलदार, इत्यादी ) यांचेशी समन्वयाने व परवानगीने गरजुंना व पीडीतांना सर्व धर्मादाय संस्था यांनी शक्य ती मदत करावी, असे आवाहन या द्वारे करीत आहे.

तसेच याहीपुढेस्पष्ट करण्यात येते की, अशी मदत करताना शासनाने घोषित केलेल्या लॉकडाउनच्या नियमांचा कोणत्याही प्रकारे भंग होणार नाही, याची खबरदारी घ्यावी. तसेच संबंधीतांकडुन कोरोना प्रसार प्रतिबंधक आरोग्य विषयक सुचनांचे काटेकोरपणे पालन केले जाईल, याची कायम दक्षता घ्यावी.

सही/-
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत माहीतीस्तव सविनय सादर-**

१. मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. प्रधान सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. मा. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी –**

१. धर्मादाय सह आयुक्त -१ आणि २, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. सर्व धर्मादाय सह आयुक्त,
   पुणे विभाग/बृहन्मुंबई विभाग/नाशिक विभाग/कोल्हापुर विभाग/औंरगाबाद विभाग/लातुर विभाग/अमरावती विभाग/नागपुर विभाग
३. सर्व संबधीत पोलिस अधिकारी, महाराष्ट्र राज्य.